**मे. मेटारोल्स इस्पात प्रा.लि., गट क्र. ४८, दरेगांव, अतिरिक्त म.औ.वि.म., टप्पा-II ला लागुन, जालना, जि. जालना, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या एम.एस.बिलेटस् /ॲलॉईज बिलेटस् उत्पादन - १,५८,४०० टन प्रतिवर्ष ते ७,२८,४०० टन प्रतिवर्ष, टीएमटी बारस् उत्पादन - १,५८,४०० टन प्रतिवर्ष ते ७,२८,४०० टन प्रतिवर्ष, आणि फेरोमँगनीज - २१,५०० टन प्रतिवर्ष/सिलिको मँगॅनीज - १८,००० टन प्रतिवर्ष या उत्पादनाकरीता अतिरिक्त केंद्र उभारणे या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाकरीता दि. १५/०६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. मेटारोल्स इस्पात प्रा.लि., यांच्या प्रस्तावित प्रकल्प स्थळी गट क्र. ४८, दरेगांव, अतिरिक्त म.औ.वि.म., टप्पा-II ला लागुन, जालना, जि. जालना, महाराष्ट्र येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत.**

मे. मेटारोल्स इस्पात प्रा.लि., गट क्र. ४८, दरेगांव, अतिरिक्त म.औ.वि.म., टप्पा-II ला लागुन, जालना, जि. जालना, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या एम.एस.बिलेटस् /ॲलॉईज बिलेटस् उत्पादन - १,५८,४०० टन प्रतिवर्ष ते ७,२८,४०० टन प्रतिवर्ष, टीएमटी बारस् उत्पादन - १,५८,४०० टन प्रतिवर्ष ते ७,२८,४०० टन प्रतिवर्ष, आणि फेरोमँगनीज - २१,५०० टन प्रतिवर्ष/सिलिको मँगॅनीज - १८,००० टन प्रतिवर्ष या उत्पादनाकरीता अतिरिक्त केंद्र उभारणे या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाकरीता दि. १५/०६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. मेटारोल्स इस्पात प्रा.लि., यांच्या प्रस्तावित प्रकल्प स्थळी गट क्र. ४८, दरेगांव, अतिरिक्त म.औ.वि.म., टप्पा-II ला लागुन, जालना, जि. जालना, महाराष्ट्र येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोक सुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१) श्री. रविंद्र बिनवडे,
जिल्हादंडाधिकारी, जालना,
जि.जालना. — अध्यक्ष.

२) श्री. अ.ज्ञा. मोहेकर,
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद. — सदस्य.

३) श्री. प.ब. हजारे,
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, जालना. — समन्वयक.

जाहीर लोक सुनावणीस उपस्थित असलेले अध्यक्ष, सदस्य आणि उपस्थित नागरीक यांची यादी येथे जोडली आहे. म.प्र.नि.मंडळ, जालना येथील डॉ. योगिनी बाळंखे यांनी उपस्थितांचे स्वागत केले व नंतर त्यांनी जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली आणि सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार अधिसुचना क्र. एस.ओ.१५३३. दि. १४/०९/२००६ व सुधारित अधिनियम क्र. एस.ओ. ३०६७ (इ) दि. ०१/१२/२००९ नुसार एम.एस.बिलेटस्

Date 16.7.2019

चे उत्पादन - १,५८,४०० टन प्रतिवर्ष ते ७,२८,४०० टन प्रतिवर्ष, टीएमटी बारस् उत्पादन - १,५८,४०० टन प्रतिवर्ष ते ७,२८,४०० टन प्रतिवर्ष, आणि फेरोमँगनीज - २१,५०० टन प्रतिवर्ष/सिलिको मँगॅनीज - १८,००० टन प्रतिवर्ष या उत्पादनाकरीता अतिरिक्त केंद्र उभारणे या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पासाठी आजची ही जाहीर लोकसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. त्यांनी पर्यावरण वने व हवामान वन मंत्रालय भारत सरकार अधिनियम क्र. एस.ओ.१५३३. दि. १४/०९/२००६ व सुधारित अधिसुचना क्र. एस.ओ. ३०६७ (इ) दि. ०१/१२/२००९ यातील तरतुदी आणि प्रस्तावित प्रकल्पाचा सारांश स्पष्ट करुन प्रकल्प प्रवर्तकांनी जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी सादर केलेला अर्ज प्राप्त झाल्यापासुन ते म.प्र.नि.मंडळाने दि. १३/०५/२०१९ रोजीच्या डेली लोकमत टाईम्स (इंग्रजी) व दैनिक सकाळ (मराठी) या वर्तमानपत्रात नोटीस प्रसिध्द होईपर्यंत पर्यावरण मंजूरी घेण्यासाठी अवलंबविण्यात येणाऱ्या पध्दतीचे वर्णन केले. त्यांनी सांगितले की सदर प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प एम.एस.बिलेटस् /अॅलॉईज बिलेटस् उत्पादन - १,५८,४०० टन प्रतिवर्ष ते ७,२८,४०० टन प्रतिवर्ष, टीएमटी बारस् उत्पादन - १,५८,४०० टन प्रतिवर्ष ते ७,२८,४०० टन प्रतिवर्ष, आणि फेरोमँगनीज - २१,५०० टन प्रतिवर्ष/सिलिको मँगॅनीज - १८,००० टन प्रतिवर्ष या उत्पादनाकरीता अतिरिक्त केंद्र हा सदर अधिसूचनेनुसार 'अ'वर्गात मोडतो, ज्यास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार ची पर्यावरण विषयक मंजूरी लागते, म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोकसुनवाणी घेणे गरजेचे आहे. त्यांनी पुढे सांगितले की सदर अधिसूचनेनुसार सदर प्रकल्पाबाबतचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेतील कार्यकारी सारांश यांच्या प्रती वेगवेगळी शासकीय कार्यालये जसे, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना, जिल्हा परिषद जालना, जिल्हा उद्योग केंद्र जालना, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जालना, मं.प्र.नि. मंडळाचे कार्यालय, औरंगाबाद, मुंबई, जालना, मंत्रालय मुंबई, ई. ठिकाणी लोकांच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आल्या होत्या. आणि सदर प्रकल्पाबाबत कुणाला काही सुचना, आक्षेप असतील तर ते त्यांनी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसात नोंदवावे असे लोकांना आवाहन करण्यात आले होते. परंतु म.प्र.नि.मंडळाच्या औरंगाबाद व जालना या कार्यालयात आजच्या तारखेपर्यंत कोणतेही लिखीत स्वरुपात आक्षेप तक्रार, इ. प्राप्त झालेले नाहीत. त्यांनी सार्वजनिक सहभागींना विनंती केली की सदर प्रकल्पाविषयी जर कुणाला काही प्रश्न, आक्षेप, सुचना, इ. असतील तर ते त्यांनी स्वत:चे व गावाचे नाव सांगून विचारावेत, आणि प्रश्न फक्त पर्यावरणाशी संबंधीत असावेत. त्यांची उत्तरे समाधानकारकरित्या दिल्या जातील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना त्यांच्या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पा बाबतचे तांत्रिक सादरीकरण करावे अशी विनंती केली.

नंतर प्रकल्पाचे सल्लागार **श्री. राजेश मानकर,** श्री. साई मनासा नेचर टेक प्रा.लि. हैद्राबाद यांनी प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाचे पावर पॉईंट सादरीकरण सुरु केले आणि सांगितेले की, डॉ. बाळंखे यांनी सांगितल्या प्रमाणे मे. मेटारोल्स इस्पात प्रा.लि. यांच्या करीता जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. कारखान्याने एम.एस.बिलेटस्/अॅलॉईज बिलेटस् उत्पादन - १,५८,४०० टन प्रतिवर्ष ते ७,२८,४०० टन प्रतिवर्ष, टीएमटी बारस् उत्पादन - १,५८,४०० टन प्रतिवर्ष ते ७,२८,४०० टन प्रतिवर्ष, आणि फेरोमँगनीज - २१,५०० टन प्रतिवर्ष/सिलिको मँगॅनीज - १८,००० टन प्रतिवर्ष या उत्पादनाकरीता अतिरिक्त केंद्र उभारणे याचे आधूनिकीकरण व विस्तारीकरण प्रस्तावित केलेले आहे. मे. मेटारोल इस्पात प्रा.लि. (पुर्वी मेटारोल्स अॅण्ड कमोडिटीज या नावाने ओळखली जाणारी ) ही राजूरी स्टील समूहातली एक कंपनी आहे. सदर कारखाना हा कंपनी अॅक्ट नुसार २००४ साली स्थापन झाला आणि तो सध्या लोह आणि स्टील उत्पादनामध्ये कार्यरत आहे. त्याकरीता कंपनीकडे मं.प्र.नि.मंडळाचा परवाना आहे. आणि आता कारखान्याने त्यांच्या उत्पादन क्षमतेचा विस्तार करण्याचे प्रस्तावित केले आहे. कारखान्याला २०१८ मध्ये

TOR प्राप्त झालेला आहे आणि सदर TOR नुसार सदर प्रकल्पाचे सल्लागार यांनी मुलभूत पर्यावरणीय गुणावत्ता, प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना या बाबींचा तपशिलवार अभ्यास करुन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केला. त्यांनी पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसूचनेनूसार जाहीर लोक सुनावणीसाठी वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या जाहीरातीचे छायाचित्र, प्रकल्प स्थळाचा गुगल नकाशा आणि प्रकल्प क्षेत्राच्या स्थळाच्या १० कि.मी. त्रिजेच्या क्षेत्रातील अभ्यास क्षेत्राचा टोपोग्राफी नकाशा दाखविला.

त्यांनी कच्चा मालाची आवश्यकता, स्त्रोत व त्याकरीता लागणारी वाहतूक विषद केली, जसे, भंगार, (स्क्रप)-४३८४८० टन प्रतिवर्ष, स्पाँज आर्यन-३१०८०० टन प्रतिवर्ष, इतर खनिजे-१५१२० टन प्रतिवर्ष फेरोमॅगनीजसाठी लागाणारा कच्चा माल-मॅगॅनीज-२.१ ते २.४ टन प्रतिवर्ष, कोक -०.३० टन प्रतिवर्ष, कोळसा-०.४ टन प्रतिवर्ष व डोलमाईट-०.२ टन प्रतिवर्ष यासाठी स्त्रोत हे इतर कारखाने/खुली बाजारपेठ आहे व वाहतुक ही रस्त्याने होईल. सदर प्रकल्पासठी लागणाऱ्या अन्य गरजा या अशा आहेत जसे, वीज-२९.० एमडब्लू ही विद्यमान प्रकल्पासाठी व प्रस्तावित प्रकल्पासाठी-२६.० एमडब्लू, विद्यमान प्रकल्पासाठी पाणी - १८५.० घ.मी.प्र.दि.न व प्रस्तावित प्रकल्पासाठी १८०.० घ.मी.प्र.दि. (पाणी पुरवठा स्त्रोत-कारखान्याचे स्वत:चे जलाशय), बॅक पावर-११५०० के.व्हि.ए. आणि विद्यमान व प्रस्तावित या दोन्ही प्रकल्पासाठी लागणारे इंधन एच.एस.डी.

सादरीकरण दरम्यान **श्री. रविंद्र बिनवडे**, जिल्हादंडाधिकारी, जालना तथा जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी सांगितले की विद्यमान प्रकल्पासाठी लागणाऱ्या विजेची आवश्यकता २९.० एमडब्लू व प्रस्तावित प्रकल्पासाठी २६.० एमडब्लू असे दाखविले, आणि प्रस्तावित प्रकल्पामध्ये विजेची आवश्यकता ३.० एमडब्लू ने कमी होईल की काय असे त्यांनी विचारले. श्री. मानकर यांनी स्पष्ट केले की विद्यमान प्रकल्पासाठी विजेची आवश्यकता ही २९.० एमडब्लू अशी आहे व प्रस्तावित प्रकल्पासाठी ती २६.० एमडब्लू अशी असेल, म्हणजेच विद्यमान व प्रस्तावित या दोन्ही प्रकल्पांसाठी एकूण विजेची आवश्यकता ही ५५.० एमडब्लू एवढी असेल. त्याच प्रमाणे विद्यमान प्रकल्पासाठी पाण्याची आवश्यकता ही १८५.० घ.मी.प्र.दि. अशी आहे व प्रस्तावित ती १८०.० घ.मी.प्र.दि. अशी असेल. म्हणजेच एकूण पाण्याची आवश्यकता ही ३५६.० घ.मी.प्र.दि. एवढी असेल. त्यांनी कारखान्याच्या स्वत:च्या मालकीच्या जलाशयाचे चित्र दाखविले जे की सदर प्रकल्पासाठी पाणी पुरवठयाचे स्त्रोत आहे. त्यांनी पुढे विविध उद्देशासाठी लागणाऱ्या पाण्याच्या आवश्यकते विषयी विषद केले, जसे विद्यमान प्रकल्पामध्ये शितकरण प्रक्रिया-१८५.० घ.मी.प्र.दि. इतर वापर -२०.० घ.मी.प्र.दि. धुळ कमी करणे-१०.० घ.मी.प्र.दि. असे एकुण २१५.० घ.मी.प्र.दि. पाणी लागते आणि प्रस्तावित प्रकल्पामध्ये शितकरण प्रक्रिया-१८०.० घ.मी.प्र.दि. इतर वापर-२०.० घ.मी.प्र.दि. असे एकूण २००.० घ.मी.प्र.दि. असे पाणी लागते. म्हणजेच विद्यमान आणि प्रस्तावित या दोन्ही प्रकल्पास एकूण पाण्याची आवश्यकता ही ४१५.० घ.मी.प्र.दि. असेल. निघणा-या सांडपाण्यावर सांडपाणी प्रक्रिया संयत्रणेत (एस.टी.पी.) प्रक्रिया केली जाईल व प्रक्रिया केल्यानंतर ते पाणी बगीच्यासाठी वापरले जाईल. आणि प्रस्तावित प्रकल्पामधून कोणतेही सांडपाणी कारखाना आवाराच्या बाहेर सोडले जाणार नाही यासाठी काळजी घेण्यात येईल.

**श्री. बिनवडे** यांनी पुढे उत्पादन क्षमता किती पटीने वाढते असे विचारले कारण उत्पादन क्षमता वाढीचा उल्लेख १,५८,४०० टन प्रतिवर्ष ते ७,२८,४०० टन प्रतिवर्ष असा केलेला आहे. म्हणजेच उत्पादन क्षमता वाढ ही ५ ते ६ पट आहे, परंतु पाण्याचा वापर त्या प्रमाणे दिसलेला नाही. श्री. मानकर यांनी सांगितले की हा मुद्दा प्रकल्प प्रवर्तक विशद करतील, त्यावर प्रकल्प प्रवर्तक श्री. डी.बी.सोनी यांनी ते ड्राय कुलींग टावर

प्रणालीचा अवलंब करतील, त्यावर **श्री. बिनवडे** यांनी सांगितले की उत्पादन क्षमता ५ पटीने वाढते, त्या प्रमाणे पाण्याचाी आवश्यकतासुध्दा ५ पटीने वाढायला पाहीजे आणि या बाबत काही पर्यायी व्यवस्था केली की काय असे सांगावे असे त्यांनी विचारले, त्यावर श्री. सोनी यांनी सांगितले की पर्यायी व्यवस्था ही फक्त ड्राय कुलींग टॉवरच आहे.

**श्री. मानकर** यांनी जमिनीच्या आवश्यकते विषयी विशद केले आणि सांगितले की मे. मेटारोल्स इस्पात प्रा.लि. यांची स्वत:ची १९.०५ एकर जमिन आहे आणि प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प हा त्याच जागेत उभारण्यात येईल. सध्या जमिनीचा वापर असा आहे, प्रकल्प क्षेत्र-६.० एकर, रस्ते व खुले क्षेत्र-२.२ एकर, हरित पट्टा विकास-६.२५ एकर आणि प्रस्तावित प्रकल्पाला लागणारी जागा ४.६ एकर असेल. आधि सांगितल्याप्रमाणे त्यांनी सांगितले की सध्याची विजेची आवश्यकता ही २९.० एमडब्लू आहे.व प्रस्तावित प्रकल्पासाठी ती. २६.० एमडब्लू असेल आणि तिची पूर्तता म.रा.वि.वि.क.लि. (MSEDCL) तर्फे करण्यात येईल. त्यांनी सांगितले की विद्यमान प्रकल्पात ४५० कामगार आधिच नोकरी करीत आहे आणि प्रस्तावित प्रकल्पात ४०० कामगार लागतील, म्हणजेच एकुण मनुष्यबळ हे ८५० असेल. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचा प्रक्रिया प्रवाह दाखविला त्यामध्ये कच्चा माल-कच्चा माल भट्टीमध्ये उच्च तापमानास वितळविणे-विळलेला कच्चा माल कास्टींग मशीन मध्ये ओतणे-रोलींग स्टॅडमध्ये हस्तांतर करणे-उष्ण बिलेट रोलींग-तयार टीएमटी बार कुलींग स्टॅडवर ठेवणे-टीएमटी बारस् ची गुणवत्ता तपासणे-टीएमटी बार विविध लांबीमध्ये कापणे-तयार टीमटी बार साठवणूक कोठारामध्ये साठवणे- ग्राहक मागणी नुसार पुरवठा करणे. त्यांनी पुढे प्रक्रियेची आकृती दाखविली आणि वरील प्रमाणे पुन्हा विषद केले जसे कच्चा माल (स्पाँज आयर्न व एमएस स्क्रॅप) १६५० डिग्री सेल्सियस तापमानाच्या भट्टीत एकत्र करणे, वितळलेले धातू कास्टींग मशीनमध्ये टाकणे आणि नंतर रोलींग स्टॅडवर ठवणे, इ. सदर प्रकल्प स्थळाचे छायाचित्र त्यांनी पुन्हा दाखविले.

आधारभूत पर्यावरण अभ्यासाच्या संबंधाने त्यांनी सांगितले की सभोवतालच्या पर्यावरणाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी त्यांनी प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प स्थळाच्या १० कि.मी. त्रिज्येच्या क्षेत्रात हवा गुणवत्ता, पाणी गुणवत्ता, ध्वनी पातळी, माती गुणवत्ता, इ. साठी प्रकल्प स्थळ, जालना, दरेगांव, बेथलाम, सिरसवाडी, सेलगाव, नागेवाडी आणि देवमूर्ती अशा ८ वेगवेगळया ठिकाणचा सप्टेंबर २०१८ ते डिसेंबर २०१८ या काळात आधारभूत पर्यावरणीय अभ्यास केला. त्यांनी सांगितले की, वरील ठिकाणी हवा गुणवत्ता, पाणी गुणवत्ता, माती गुणवत्ता व ध्वनी पातळी, इ.चे परिक्षण तपासणी केली असता असे आढळुन आले की सदर भागातील हवा गुणवत्ता, ध्वनी पातळी, माती गुणवत्ता ही निर्धारीत मानकांच्या आत आहे. प्रकल्प स्थळाच १० कि.मी. त्रिज्येच्या क्षेत्रात हवा, ध्वनी पातळी, माती, इ. चे ज्या ठिकाणी परिक्षण केले त्या ठिकाणांचे नकाशे दाखविले. त्यांनी सांगितले की पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी त्यांनी प्रकल्प क्षेत्रात वेगवेगळया ८ ठिकाणाचे भुपृष्टावरील पाणी व भुगर्भातील पाण्याचे नमुने गोळा केले. त्यांचे पृथ:करण विशेषण केले आणि भुपृष्टावरील पाण्यामध्ये वेगवेगळया घटकांचे प्रमाण आढळुन आले ते असे पीएच-७.२ ते ८.१, एकूण विद्राव्य घटक-१८९.०-४०८.० मिलिगॅम/लिटर, एकूण जडत्व-१२६.०-२९२.३ मिलिगॅम/लिटर, क्लोराईडस्-२८.०-३९.८मिलिगॅम/लिटर आणि जड धातुचे प्रमाण हे निर्धरित मानकांपेक्षा कमी आढळुन आले. त्यांनी प्रकल्प क्षेत्रातील जैव पर्यावरण विषद केले आणि सांगितले की आययुसीएन मार्फत प्रसिध्द कारण्यात येणारी रेड डाटा लिस्ट ही जगातील अत्यंत व्यापक सुची आहे. त्यामध्ये जगभरातील वनस्पती व प्राणांच्या विविध प्रजातींची नोंद ठेवली जाते. जगभरातील हजारो विविध प्रजाती व त्याच्या उपजातींच्या नामशेष होण्यामागची कारणे शोधण्याकरीता तयार करण्यात आलेल्या मापदंडाचा एक संच तयार केलेला आहे. या मधील

निकषांचा वापर सर्व प्रजाती आणि जगभरातील विविध ठिकाणामधील प्राणीमात्रांचा अभ्यास करण्याकरीता केला जातो. वैज्ञानिक आधाराच्या जोरावर आययुसीएन रेड लिस्ट मध्ये असलेली जैव विविधता व स्थिती ही आर्धकृत मार्गदर्शक म्हणुन ओळखली जाते. भारतीय वनस्पती करीता असलेल्या रेड डाटा बुक मध्ये नोंदणी असलेली कोणतीही वनस्पती प्रकल्पापसून १० कि.मी. परिसरामध्ये आढळुन आलेली नाही. त्यांनी सामाजिक-आर्थिक पर्यावरणा विषयी नमुद केले, ज्यामध्ये एकुण लोकसंख्या, कुटूंबाची संख्या, एकुण पुरुष, एकुण स्त्रीया, साक्षरता, इं. चा तपशील समाविष्ट आहे.

**श्री. मानकर** यांनी पुढे पर्यावरण आघात मुल्यांकन आणि उपयायोजना विषयी विषद केले आणि खालिलप्रमाणे सांगितले.

**वायु प्रदूषण व उपयायोजना:-** केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषनुसार वायु उत्सर्जनासाठी प्रत्योकी ३० मीटर उंचीच्या ३ चिमण्या बसविण्यात येतील व डि.जी. सेटच्या चिमणीची उंची छतापेक्षा ३ मी. उंच असेल, चिमणीतील वायु उत्सर्जन हे ऑनलाईन तपासणी प्रणाली (Online Monitoring System) द्वारे तपासले जाईल. सभोवतालच्या हवेची गुणवत्ता व चिमणीतील उत्सर्जन यावर नियमितपणे देखरेख ठेवल्या जाईल व सदर भागातील रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण केले जाईल. हवेतील दुषित घटक हे मर्यादेत आहे किंवा नाही हे जाणण्यासाठी प्रकल्प क्षेत्र व सभोवतालच्या परिसरातील वायु तपासणी नियमितपणे केल्या जाईल.

**पाणी गुणवत्ता व्यवस्थापन:-** प्रस्तावित प्रकल्प हा झीरो लिक्वीड डिस्चार्ज (ZLD) प्रणालीवर आधारीत आहे. त्यामुळे पाण्याचा एक थेंब देखील सभोवतालच्या परिसरात सोडल्या जाणार नाही आणि निर्माण होणारे सांडपाणी हे प्रक्रिया केल्या नंतर वृक्षारोपणासाठी वापरण्यात येईल.

**ध्वनी प्रदूषण नियंत्रण:-** ध्वनी पातळी ही योग्य गणितीय सुत्र वापरुन मोजली आहे. प्रकल्प सीमेवर ध्वनी पातळी कोणत्याही नियंत्रण प्रणाली शिवाय ७० डेसीबल पेक्षा कमी असायला पाहीजे अशी अपेक्षा आहे, प्रकल्पाच्या विविध प्रक्रियामधुन निघणारा आवाज योग्य तंत्रज्ञान वापरुन, योग्य देखरेख करुन नियंत्रीत केला जाईल, विविध यंत्राची वेळोवेळी देखरेख व ऑईलिंग केल्या जाईल, डी.जी. सेटला ध्वनीरोधक आवरण बसविण्यात येईल. प्रकल्प परिसरात हरित पट्टा विकसित केला जाईल जेणे करुन ही झाडे प्रकल्पाच्या विविध प्रक्रियांमधून व वाहतुकीमुळे निघणाऱ्या आवाजाला रोधक म्हणुन काम करतील.

**हरित पट्टा विकास आणि वृक्षारोपण:-** प्रकल्पाच्या ३३% क्षेत्रावर हरित पट्टा विकसित केला जाईल.

त्यांनी पुढे पर्यावरण व्यवस्थापन योजने विषयी विषद केले आणि सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाचा भांडवली खर्च हा रु. १० कोटी असेल त्यामध्ये वायु प्रदूषण नियंत्रण, पाणी प्रदूषण नियंत्रणा, ध्वनी प्रदूषण नियंत्रण, पर्यावरण निरिक्षण व व्यवस्थापन व्यवसायिक आरोग्य, हरित पट्टा विकास, सुरक्षा व्यवस्थापन, प्रयोगशाळा आणि रसायने, इ.चा समावेश होतो व त्यासाठी आवर्ती खर्च हा रु. ८५ लाख प्रति वर्ष असेल.

विद्यमान प्रकल्पाने व्यवसाईक सामाजिक जबाबदारी अंतर्गत वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम जसे, योगा, मॅरेथॉन, इ. राबविले आहेत, त्याचे छायाचित्र त्यांनी दाखविले. प्रकल्प प्रवर्तकांनी त्यांच्या स्वत:च्या मालकीचे पाणी त्यांच्याच कारखान्यात वापरले याविषयी कॉर्पोरेट वाटर रिस्पॉन्सीबीलीटी (Corporate

Water Responsibility) 'आपला उद्योग आपले पाणी' या शिर्षाखाली वर्तमानपत्रात आलेल्या बामतीचे देखील त्यांनी छायाचित्र दाखविले.

**श्री. मानकर** यांनी सी.इ.आर. अंदाजपत्रकाविषयी नमुद केले आणि सांगितले की मे. मेटारोल्स इस्पात प्रा.लि. (एमआयपीए) यांनी सी.इ.आर. खाली रु. १.५ कोटीची तरतुद केलेली आहे. दि. १ मे २०१८ च्या एमओईएफसीसी ओएम (MOEFFCC OM) नुसार अतिरीक्त भांडवली खर्चाच्या ०.७५% अशी सी.इ.आर. ची गणना केली आहे. सार्वजनिक लोक सुनावणी दरम्यान सभोवतालच्या लोकांतर्फे जर गरजेनुसार वेगवेगळ्या मागण्या प्राप्त झाल्यास त्या मान्य केल्या जातील. त्यांनी सांगितले की परवानगी मिळण्याच्या तारखेपासुन १० महिन्याच्या आत वरिल सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या जातील आणि नंतर त्यांनी प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाचे सादरीकरण संपविले समाप्त केले.

प्रकल्प प्रवर्तकाने प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाबाबतचे पावर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर डॉ. योगिनी बाळंखे यांनी सार्वजनिक सहभार्गीना विनंती केली की प्रसावित प्रकल्पाच्या बाबतीत जर कुणाच्या काही सुचना, निवेदन,इ. असतील तर ते त्यांनी स्वत:चे नाव व गावाचे नाव सांगुन विचारु शकतात त्यांची उत्तरे प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार देतील.

जाहीर लोक सुनावणी दरम्यान सार्वजनिक सहभागी व समिती सदस्य यांनी सदर प्रकल्पाविषयी काही प्रश्न उपस्थित केले व त्यांची उत्तरे प्रकल्प प्रर्वतक/प्रकल्प सल्लागार यांनी दिले होते, ते खालील प्रमाणे आहेत.

१) **श्री. गणेश तुकाराम ढवळे,** गामपंचायत सदस्य व माजी सरपंच, दरेगाव, जि. जालना यांनी त्यांच्या गावामध्ये ट्री गार्ड सहीत १००० झाडे लावण्याची विनंती केली, **श्री. डी.बी.सोनी,** प्रकल्प प्रर्वतक यांनी ते मान्य केले आणि सांगितले की मागच्या वर्षी जसे त्यांनी नदी रुंदीकरणाचे काम केले, तसेच या वर्षी देखील ते ट्री गार्डन सहीत झाडे लावतील.

२) **श्री. ढवळे,** सरपंच, दरेगाव, जि. जालना यांनी सांगितले की सदर प्रकल्प हा त्यांच्या गावाच्या फार जवळ आहे, म्हणून त्यांच्या गावाला रोजगारासाठी प्राधान्य द्यावे अशी त्यांनी विनंती केली. त्यावर **श्री. सोनी** यांनी सांगितले की दरेगावातील जास्तीत जास्त लोक त्यांच्या विद्यमान कारखान्यात काम करीत आहे. काही काम न करणारे लोक वेगवेळ्या धंदयात व्यस्त आहेत, तथापि, कुशल कामगार हे सातत्याने दरेगावातुन घेतल्या जाताली आणि दरेगावातील अकुशल कामगारांना कौशल्य पुरवण्यासाठी प्रयत्न केले जातील कारण कौशल्य विकास करणे फार आावश्यक आहे, कारण कमीत कमी पात्रता ही आयटीआय (ITI) आहे, आणि १० वी किंवा १२ वर्गाच्या व्यक्तींना चांगली नोकरी देणे फार अवघड जाते. सदर भागातील काही विद्यार्थांना आटीआय शिक्षण घेण्यात काही अडचणी येत असतील तर ते त्यासाठी ग्रामपंचायतीच्या सहकार्याने मदत करतील असे देखील त्यांनी सांगितले.

३) **श्री. गणेश तुकाराम ढवळे,** गामपंचायत सदस्य व माजी सरपंच, दरेगाव, जि. जालना यांनी सांगितले की इतर गावांच्या तुलनेत त्यांच्या गावामध्ये जास्त प्रदूषण आहे आणि त्यासाठी काय उपाययोजना केल्या जातील असे त्यांनी विचारले. **श्री. सोनी** यांनी सांगितले की विद्यमान प्रकल्पापेक्षा प्रस्तावित प्रकल्पामध्ये आधूनिक वायु प्रदूषण नियंत्रण प्रणाली बसविण्यात येईल, त्यासाठी जास्तीचा खर्च करण्यात येईल आणि ते प्रस्तावामध्ये प्रस्तावित केले आहे.

४) **श्री. श्रीहरी साहेबराव ढवळे,** माजी सरपंच, दरेगाव, जि. जालना यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत मागच्या वर्षी सदर भगामध्ये छोट-छोटे बंधारे बांधले आणि या वर्षी तसेच काम करतील काय असे त्यांनी विचारले. **श्री. सोनी** यांनी सांगितले की मागच्या वर्षी पाणी किती आले, त्याचा फायदा किती झाला, वैगेरे पाहिल्या जाईल आणि जर त्या बंधाऱ्याच्या मागच्या बाजूस काही चालना (Scope) असेल तर त्यांचे पोकलँड मोकळे झाल्यानंतर यावर्षी पुन्हा तसे काम केल्या जाईल.

५) **श्री. दरेकर,** जवळचे गााव दरेगाव, जि. जालना येथील रहिवाशी यांनी सदर प्रकल्पामुळे गरीब लोकांना काया फायदा मिळेल असे विचारले. **श्री. सोनी** यांनी सांगितले की ते त्यांची स्वत:ची वाळु (Slag) वापरुन त्यांचे बांधकाम करीत आहे, आणि मागील सहा वर्षापासून त्यांनी अन्य कोणत्याही प्रकारची वाळु विकत घेतलेली नाही. त्यांनी असे सुध्दा सांगितले की ते त्यांच्या प्रकल्पातुन निर्मीत होणाऱ्या वाळुची जाहीरात करीत आहे कारण ती पर्यावरणास पुरक आहे व अलिकडेच त्यांनी या बाबतीत रुरकी आयआयटी शी सहयोग केलेला आहे. **श्री. रविंद्र बीनवडे,** जिल्हादंडाधिकारी, जालना तथा जाहिर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी सदर वाळु ही दरेगावातील लोकांना त्यांचा फायदा म्हणून सवलतीच्या दरात किंवा मोफत उपलब्ध करुन द्यावी असे सूचविले, यावर श्री. सोनी यांनी सांगितले की दरेगावातील कोणत्याही बांधकामासाठी सदर वाळु मोफत दिल्या जाईल, त्यावर जाहीर लोक सुनवाणीस उपस्थित असलेल्या दरेगावातील लोकांनी आनंदाने टाळ्या वाजविल्या.

६) **श्री. पाटील,** आयसीटी विद्यार्थी, जालना यांनी स्टील उद्योगातुन मोठ्या प्रमाणात स्लॅग निर्माण होतो त्याच्या विल्हेवाट व्यवस्थापनाकरीता प्रकल्प प्रवर्तकाच्या बहुमुल्य मताविषयी विचारले. **श्री. सोनी** यांनी सांगितले की या अगोदर त्यांनी बांधकाम उद्योगात स्लॅग वापरुन त्याची विल्हेवाट लावतात आणि मागच्या सहा वर्षापासून एक सिंगल ट्रक देखील नदीची वाळु त्यांनी त्यांच्या स्वत:साठी वापरली नाही, ते स्लॅगची जाहीरत देखील करीत आहे आणि विकत आहे असे त्यांनी सांगितलें. परंतु आता ते स्लॅगच्या लोक प्रियतेसाठी वर्तमानपत्रातुन जाहीरात अभियान सुरु करणार आहेत जेणे करुन लोक त्याचा उपयोग करु शकतात. त्यांनी असे सुध्दा सांगितले की सदर वाळु फार चांगली आहे, त्यात सिलिकाचे प्रमाण सुध्दा फार चांगले आहे व ती नदीच्या वाळु पेक्षा अधिक चांगली आहे, आणि आता त्यांनी या बाबतीत रुरकी विद्यापिठाशी सहयोग केलेला आहे.

७) **श्री. भावेश,** जालना शहरातील रहिवाशी यांनी औद्योगिक क्षेत्रामध्ये वायु प्रदूषण निदर्शनास आले आहे म्हणून वायु प्रदूषण कमी करण्याच्या पध्दती विषयी विचारले. **श्री. सोनी** यांनी सांगितले की

महामार्गा वरील वायु प्रदूषणाच्या तुलनेत म.औ.वि.म. (MIDC) क्षेत्रात वायु प्रदूषण जास्त आहे आणि त्यांनी स्पष्ट केले की उत्पादनाच्या संबंधाने प्रदूषण नियंत्रण साधने चांगली आहेत, परंतु टॅपींग प्रक्रियेत काही धूर बाहेर येतो तो प्रणालीत घेतल्या जाऊ शकत नाही. परंतु तो प्रस्तावित प्रकल्पामध्ये प्रणालीत घेत्यल्या जाईल. **श्री. सोनी** यांनी पुढे संगितले की जालना येथे आयसीटी महाविद्यालय सुरु झालेले आहे त्यामध्ये तीन वर्षे शैक्षणीक व तीन वर्षे कारखान्यात काम करण्याचे आहेत म्हणून त्यांचे असं मत आहे की जर आयसीटी च्या सर्व विद्यार्थांनी जालना म.औ.वि.मं. क्षेत्रात तीन महिने काम केले तर ते संपूर्ण जालना म.औ.वि.मं. क्षेत्राला फायद्याचे होईल.

८) **श्री. रविंद्र बिनवडे,** जिल्हादंडाधिकारी, जालना तथा जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी निदर्शनास आणुन दिले की ३३% क्षेत्रावर झाडे लावायला पाहिजे आणि बऱ्याच वेळा ३३% क्षेत्रावर झाडे लावण्याची हमी (Commitment) दिली जाते, परंतु ते तसं दिसत नाही. म्हणून त्यांनी सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि वन विभाग हे संपूर्ण जालना म.औ.वि. मं येथे ३३% क्षेत्रावर झाडे लावतील. त्या करीता प्रकल्प प्रवर्तकांनी आधिच आर्थिक तरतुद केलेली आहे त्यामुळे ते व्यवसाईक दृष्ट्या व्यवस्थित होईल आणि प्रकल्प प्रवर्तकांना वेगळं असं कही करायची गरज नाही कारण त्यामध्ये शासन समाविष्ट असेल. म.प्र.नि.मंडळाने असा प्रस्ताव सादर करावा असे त्यांनी सुचविले. त्यांनी पुढे सांगितले की ते (प्रशासन) कोणती झाडे लावायला पाहीजे या बाबतीत वन विभागास निर्देश देतील कारण जालन्याचे वनक्षेत्र हे फक्त १.२९% आहे आणि ते वाढविल्या जाऊ शकत नाही आणि वन विभागाला काम करण्यासाठी काही ठरावीक मर्यादा आहेत, परंतु ज्या ठिकाणी वृक्षरोपण बंधनकारक आहे अशा ठिकाणी जर वन विभागाने काम केले तर ते जालन्यातील नागरीकांना निश्चितच फायदेशिर होईल. त्यामुळे प्रकल्प प्रवर्तकांचे काम हलके होईल व जबाबदारी कमी होईल कारण त्यामध्ये शासकीय विभाग समाविष्ट असेल आणि खर्च हा पकल्प प्रवर्तकांनी केलेल्या तरतुदीमधून केला जाईल म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि वन विभाग यांनी वृक्षारोपणासाठी प्रस्तावित प्रकल्पासाठी नव्हे तर संपूर्ण जालना म.औ.वि.मं. क्षेत्रासाठी असा संयुक्त प्रस्ताव सादर करावा असे सुचविले. त्यांनी पुढे असे ही निदर्शनास आणून दिले की आतापर्यंत पुश्कळ परवानग्या दिल्या, परंतु सदर जाहिर लोक सुनावणीकडे येत असतांना तशा प्रकारचे वृक्षारोपण दिसून आले नाही. त्यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तकांनी तरतुद केलेली आहे मग प्रकल्प प्रवर्तकाऐवजी वन विभाग काम करेल कारण ते त्या क्षेत्रात तज्ञ (Expert) आहेत, या बाबतीत प्रकल्प प्रवर्तकांचा मालकी हक्क असणार नाही, काही ठराविक शोध (Concept) येत आहे, त्यांची अंमलबजावणी करायला पाहिजे आणि नंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना विचारले की या बाबी बद्दल त्यांचे काही म्हणणे आहे की कसे, यावर श्री. सोनी यांनी सांगितले की सदर सुचनेचे पालन केले जाईल.

९) **श्री. ढवळे,** सरपंच, दरेगाव, जि. जालना यांनी सदर विभागामध्ये आरोग्य शिबीरे, वैगेरे घेतल्या जातील की काय असे विचारले त्यावर **श्री. सोनी** यांनी सांगितले की त्यांच्या तर्फे "बेटी बचाव अभियान" राबविल्या जात आहे. त्यामध्ये लवकरच स्त्रियासाठी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात येईल.

त्यानंतर डॉ. **योगिनी बाळंखे** यांनी सांगितले की जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष यांनी सुचविल्या प्रमाणे संपुर्ण जालना म.औ.वि.मं. क्षेत्रात वृक्षारोपण करण्याचा प्रस्ताव लवकरच सादर करण्यात येईल, आणि नंतर त्यांनी जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सर्व सार्वजनिक सहभागींचे आभार मानुन जाहिर लोक सुनावणी संपन्न केली.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानुन जाहीर लोकसुनावणी संपन्न झाली.

(अ.ज्ञा.मोहेकर)
सदस्य

(रविंद्र बिनवडे)
अध्यक्ष

(प.ब.हजारे)
समन्वयक